# महाराष्ट्र शासन

## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०२०-२१/महाडीबीटी/1050 दिनांक : १८.०३.२०२१

**ईमेलद्वारा तात्काळ**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - महाडीबीटी पोर्टलवर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीबाबत...**

संदर्भ : - १. मा. संचालनालयाद्वारे ईमेलद्वारे प्राप्त यादी.
२. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/२०७० दिनांक : ६.१०.२०२०.
३. प्रस्तुत कार्यालयाचे पत्र क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/२४४९ दिनांक : ०५.११.२०२०.
४. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य.२०२०-२१/डीबीटी/५३६६ दिनांक : १७.०३.२०२१

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांना अधिक माहितीसाठी सर्व योजनांबाबत महाडीबीटी पोर्टलवर पात्रता नियम, व्हीडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन याबाबतीत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ आणि २०१९-२० या दोन्ही वर्षांकरिता पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरीता अर्ज केले होते. त्यापैकी ज्या पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली नाही. त्या विद्यार्थ्यांची जिल्हा-तालुका-महाविद्यालयनिहाय मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅटमधील यादी कार्यालयाच्या www.jdhepune.info संकेतस्थळावर संदर्भिय पत्र क्र. २ व ३ अन्वये जोडण्यात आली आहे. संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये मा. शिक्षण

संचालनालयाने अद्यापपर्यंत केलेल्या सर्व कार्यवाहीचा अहवाल व अद्यापही प्रलंबित असल्याची कारणे नमूद करून सर्व महाविद्यालयांचे / संस्थांचे / विद्यापीठांचे शिष्यवृत्ती जमा न होण्याचे कारण पत्रामध्ये नमूद करुन तात्काळ / उलटटपाली/ ईमेलद्वारे मागितली आहे.

**तरी संदर्भिय पत्र क्र. २ व ३ मध्ये जोडलेल्या यादीमधील सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी यादीमध्ये नमूद सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त नमूद कॉलममधील प्रलंबित रहाण्याच्या कारणानुसार आपल्या स्तरावरुन योग्य ती पूर्तता करणेबाबत तात्काळ सूचना द्यावी. तसेच यादीमधील सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी यादीमध्ये नमूद विद्यार्थीनिहाय प्रलंबित रहाण्याची कारणे यांची पूर्तता आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. सदर प्रलंबित कारणांची पूर्तता तातडीने केल्यास प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम डीबीटी प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये लवकरात लवकर जमा करण्यात येईल. यादीमधील संस्था / महाविद्यालय / विद्यापीठांनी तातडीने सदर त्रुटींची पूर्तता करण्याबाबत विद्यार्थ्यांना कळवावी तसेच संस्था / महाविद्यालय / विद्यापीठांनीदेखील सदर पूर्तता त्वरीत करावी. सदर पूर्तता न करण्यात आल्याने एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची नोंद घ्यावी. तसेच संदर्भिय पत्र क्र. २ व ३ नुसार केलेल्या सर्व कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पत्राद्वारे jdpunescholarship@gmail.com या ईमेल आयडीवर तात्काळ /ईमेलद्वारे/ उलटटपाली पाठविण्यात यावी. यादीमधील एकाही महाविद्यालयाची माहिती ईमेलद्वारे अप्राप्त राहिल्यास सदर महाविद्यालयाने कार्यवाही केली नाही असे मा. संचालनालयास कळविण्यात येईल.तरी सदर माहिती गांभीर्याने jdpunescholarship@gmail.com या ईमेल आयडीवर तात्काळ /ईमेलद्वारे उलटटपाली पाठविण्यात यावी.**

(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.